**प्रेस नोट**

**दिनांक २४/०४/२०१९**

| | |
|---|---|
| **युनिट** | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, |
| **आरोपी इतर लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | १. सौ.अनिता राजु मेश्राम, वय–४५ वर्ष, पद –जिल्हा परिषद सदस्य, तळेगाव दशासर सर्कल जि.प.अमरावती जि. अमरावती.<br>२. श्री. राजु एकनाथ मेश्राम, वय–५० वर्ष, धंदा–शेती (खाजगी व्यक्ती) |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | १५,०००/– रु. |
| **तडजोडी अंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम** | १०,०००/– रु. |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | १०,०००/– रु. |
| **घटनास्थळ** | आरोपी यांचे राहते घर, सिध्दार्थ नगर, तळेगाव दशासर ता. धामणगाव रेल्वे जि. अमरावती. |
| **घटना ता. व वेळ** | दि.२४/०४/२०१९ चे १२.१९ ते १२.३७ वाजेच्या सुमारास. |

**थोडक्यात हकीकत :–** यातील तक्रारदार हे लाकुड तोडुन विक्रीचा व्यवसाय करत असुन त्यांनी तळेगाव दशासर येथील तलावाचे भिंतीवरील छाटलेल्या बाभळीच्या झाडामुळे त्यांचे विरुध्द तक्रार न करण्याकरीता जि.प. सदस्या श्रीमती मेश्राम हया त्यांना १५,०००/– रु. लाचेची मागणी करीत आहेत. अशी तक्रार त्यांनी दिनांक २३/०४/२०१९ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथे दिली. दिनांक २४/०४/२०१९ रोजी सदर तक्रारीच्या पडताळणी कार्यवाही दरम्यान श्रीमती अनिता मेश्राम, जि.प.सदस्य यांनी तक्रारदार यांनी तळेगाव दशासर येथील तलावाचे भिंतीवरील छाटलेल्या बाभळीच्या झाडामुळे त्यांचे विरुध्द तक्रार न करण्याकरीता तक्रारदार यांना १५,०००/– रूपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १०,०००/– रूपये लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. दिनांक २४/०४/२०१९ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान जिल्हा परिषद सदस्य श्रीमती अनिता मेश्राम यांनी तक्रारदार यांचे कडुन १०,०००/– रुपये लाचेची रक्कम पंचांसमक्ष स्विकारुन त्यांचे पती नामे श्री.राजु मेश्राम यांचे कडे दिल्याने दोघांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधिक्षक श्री. श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधिक्षक श्री.पी.डी.डोंगरदिवे, पोलीस उपअधिक्षक श्री.गजानन पडघन, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक श्रीमती रुपाली पोहनकर, पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र जेधे, पोलीस कर्मचारी म.पो.हे.कॉ.ज्योती झाडे, म.पो.हे.कॉ.माधुरी साबळे, ना.पो.का युवराज राठोड, पो.शी. शैलेश कडु, चालक स.पो.उपनि सतिश किटुकले यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भष्ट्राचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबदल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

सपर्क – अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. ललील सेंटर, परांजपे कॉलनी
टोल फ्री क्रमांक – १०६४, दुरध्वनी क्रमांक ०७२१– २५५२३५५, २५५३०५५

( रुपाली पोहनकर )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.

Scanned by CamScanner